स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 10–04–2015** रोजी **दुपारी 12–15** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 13. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 14. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 15. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 16. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 20:— प्रभाग क्र. 51 ब अंतर्गत धंतोली येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.एम.दयारमानी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.95 टक्के अधिक दराची रू. 52,47,071/— (रूपये बावन्न लक्ष सत्तेचाळीस हजार एकाहत्तर) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 682 ( A2200133803) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी रू. 49,99,592/— लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात आर्थिक वर्ष 2015–16 मध्ये नव्याने प्रावधानाची नोंद घेऊन विषय परत स्थायी समिती समोर सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 21</u>:— प्रभाग क्र. 39 अ आणि ब महात्मा गांधी येथील कुंभारपुरा, गरूडखांब चितारओळी व नबाबपुरा, हत्तीनाला व हमालपुरा स्लम भागातील रस्तयाचे डांबरीकरण करण्याच्या कामस्तव प्राप्त 3 निविदा पैकी मे. आर.एम. दयारमाणी यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 4.83 प्रतिशतने अधिक दराची रू. 31,43,569/— (एकतीस लक्ष त्रेचाळीस हजार पाचशे एकोणसत्तर रूपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी रू. 29,98,730/— पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात आर्थिक वर्ष 2015—16 मध्ये नव्याने प्रावधानाची नोंद घेऊन विषय परत स्थायी समिती समोर सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 22</u>:— प्रभाग क्र. 41 अ आणि ब महाल येथे श्री. सावल यांचे घरापासून ते टिळक रोड पर्यंत सिमेंट कॉक्रिट रोडचे बांधकाम करण्याच्या कामासतव प्राप्त 3 निविदांपैकी मे. एस.के. एन्टरप्राईझेस यांची प्राकलनीय दरांपेक्षा 8.78 प्रतिशत ने कमी दरांची रू. 27,36,190/— (अक्षरी सत्तवीस लक्ष छत्तीस हजार एकशे नव्वद रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात आर्थिक वर्ष 2015—16 मध्ये नव्याने प्रावधानाची नोंद घेऊन विषय परत स्थायी समिती समोर सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 23</u>:— प्रभाग क्र. 41 महाल येथील राजपथ चौक ते मातंगपूरा चौका पर्यंत सिमेंट कॉक्रींट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. एम. आर. ढोबळे यांची प्राकलनिय दरांपेक्षा 4.99 प्रतिशत ने कमी दरांची रू. 60,06,984/— (अक्षरी साठ लक्ष सहा हजार नऊशे चौऱ्यांशी रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात आर्थिक वर्ष 2015—16 मध्ये नव्याने प्रावधानाची नोंद घेऊन विषय परत स्थायी समिती समोर सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 24</u>:— मध्य नागपूरातील अल्पसंख्याक वस्त्यातील विकास कामातंर्गत प्रभाग क्र. 28, मोमीनपुरा, बोरीयापुरा येथील सार्वजनिक शौचालयाचे ठिकाणी सभागृहाचे बांधकामास्तव रू. 45,42,793/— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 25</u>:— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**—: ठराव :—**

नागपूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातर्फे नागरिकांना बांधकाम परवानगी देतांना विविध शुल्क आकारण्यात येते. ज्याअर्थी नगर रचना विभागातर्फे इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी घेते वेळी आकारावयाचे विविध शुल्क नागपूर महानगरपालिकेच्या प्रस्तावित अंदाजपत्रक वर्ष 2008—2009 मध्ये विषय क्र. 185—अ द्वारे सादर करण्यात आले होते. यास म.न.पा. ठराव क्र. 246 दि. 05.07.2008 नुसार म.न.पा. सभागृहाने रितसर मंजूरी प्रदान केली आहे. त्याअर्थी एकदा सभागृहाने मंजूर केलेल्या कोणत्याही निर्णयामध्ये फेरबदल करावयाचा झाल्यास यासाठी स्थायी समिती आणि सभागृहाची मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतू नागपूर महागरपालिकेच्या प्रशासनाने स्थायी समिती तसेच सभागृहाची रितसर मंजूरी न घेता, सन 2008 मध्ये मंजूर केलेल्या इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी घेते वेळी भरावयाचे विविध शुल्का मध्ये फेरबदल करुन वाढ केली आहे. ही प्रशासनातर्फे झालेली अनियमीतता आहे. आणि केलेली दरवाढ हे रास्त नसुन त्यामुळे स्थानिक वर्तमानपत्रात याविरुध्द जनआक्रोशाला वाचा फुटलेली आहे. तसेच विविध नागरी संघटनांचे निवेदने म.न.पा. पदाधिकाऱ्यांना प्राप्त होत आहे. ही शुल्क वाढ भरमसाठ असून या एक महिन्याच्या कालावधीत जेवढी प्रस्तावित बांधकाम रेखाचित्र सादर झालीत त्यांचे भुगतान करण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. त्यामुळे म.न.पा. चे आर्थिक नुकसान तर होतच आहे तसेच नागरिकांचा अनधिकृत बांधकामाचा कल वाढत आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 124 ब मध्ये तत्कालीन राज्य शासनाने फेरबदल करुन आकारावयाच्या विकास शुल्कात भरमसाठ वाढ केली ती वाढ म.न.पा. प्रशासनाने दि. 25.02.2015 पासून लागू केलेली आहे. सदर्हु वाढ ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 मध्ये फेरबदल करुन केलेली असल्याने यातील निर्धारीत दरात घट करण्याचा अधिकार स्थायी समिती व म.न.पा. सभागृहाला नाही.

तेव्हा प्रशासनाने परिपत्रक क्र. म.न.पा./नरवि/परिपत्रक—विकास शुल्क/5327 दि. 23.02.2015 यावर स्थायी समितीने स्थगिती देणे योग्य होणार नाही परंतू उपरोक्त प्रस्ताव प्रशासनाने रितसर स्थायी समितीच्या माध्यमातून म.न.पा. सभागृहाच्या पटलावर ठेवावा जेणे करुन सभागृहास यावर योग्य तो निर्णय घेता येईल.

तथापी प्रशासनाने स्थायी समिती व सभागृहाच्या मान्यतेशिवाय लागू केलेले इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी प्राप्त करण्यासंबंधी भरावयाचे विविध शुल्क परिपत्रक क्र. म.न.पा. /नरवि/परिपत्रक 594 दि. 29.08.2011 तसेच परिपत्रक क्र. म.न.पा. /नरवि/परिपत्रक 1129 दि. 16.09.2014 यास त्याच्या अंमलबजावणीस ही स्थायी समिती या ठरावाद्वारे स्थगिती देत आहे. तसेच प्रशासनास सूचीत करण्यात येते की विविध शुल्का मध्ये दरवाढ करावयाचे असल्यास यासाठी रितसर प्रस्ताव स्थायी समिती

मार्फत सभागृहासमोर 15 दिवसाचे आत सादर करावा. तसेच असेही निर्देशित करण्यात येते की, जो पर्यंत सुधारीत दरवाढीला म.न.पा. सभागृह मंजूरी प्रदान करीत नाही तो पर्यंत म.न.पा. ठराव क्र. 246 दि. 05.07.2008 नुसार निर्धारित केलेल्या दराप्रामणे नगर रचना विभागाने इमारत बांधकाम व अभिन्यास मंजूरी करिता विविध शुल्क आकारण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.

सुचक – हस्ता/– ॲड. संजयकुमार बालपांडे
अनुमोदक – हस्ता/– श्री. दिपक पटेल
हस्ता/– सौ. निता ठाकरे

<u>ठराव क्रमांक 26</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर